“मराठवाडयातील तृतियपंथियांच्या सामाजिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन ”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत समाजशास्त्र विषयातील
विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंधाचा
आराखडा

प्रारुप आराखडा
(Synopsis)

संशोधक
लोखंडे संदीपकुमार भिमराव
एम.ए.,बी.एड.नेट (समाजशास्त्र)

मार्गदर्शक
प्रा. डॉ. फिसफिसे टि.आर.
एम.ए. नेट.पीएच.डी.
सहाय्यक प्राध्यापक व समाजशास्त्र
विभाग प्रमुख

श्री. शिवाजी महाविद्यालय, परभणी

संशोधन केंद्र
सामाजिकशास्त्र संकूल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

प्रस्तावना : (Introduction)

26 जानेवारी 1950 रोजी भारत एक प्रजासत्ताक राष्ट्र झाले. या दिवशी भारताने संविधानाचा पूर्णपणे स्वीकार केला. संविधानातील एक महत्वाचे तत्व म्हणजे समतेचा किंवा समानतेचा अधिकार होय. समतेच्या तत्वानुसार राज्य कोणत्याही व्यक्तित वय, जात, धर्म, वंश, लिंग, प्रांत या आधारावर कोणत्याही स्वरुपाचा भेदभाव करणार नाही. यानुसार देशातील सर्व नागरिकांना कायद्यामुळे समान मानण्यात येईल. त्यांना विकासाच्या समान संधी देण्यात येईल. पण आजही भारतीय समाजव्यवस्थेत मोठया प्रमाणात जात, धर्म, वंश, प्रांत याबरोबर लिंगावर आधारीत विषमता मोठया प्रमाणात अस्तित्वात असल्याचे दिसून येते. स्त्री पुरुष हा भेद मानून व्यक्तिचे अधिकार मर्यादित करण्याचा प्रयत्न समाजव्यवस्थेद्वारा केला जातो. जीवनसृष्टीच्या निर्मितीतील अंतिम अवस्था म्हणजे मानव प्राण्यांची निर्मिती मानली जाते, मानवाच्या सामूहीक जीवनापासून पृथ्वीतलावर स्त्री-पुरुषाचे अस्तित्व आहे. तरी स्त्री-पुरुष हा भेद म्हणजे लिंगाधिष्ठित भेदभाव समाज व्यवस्थेच्या निर्मितीमध्ये महत्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे. यामुळेच समाजव्यवस्थेत लिंग, लिंगभाव विषमता, लिंगभेद या घटकांना महत्व प्राप्त झाले आहे.

लिंग हे स्त्री-पुरुष सामाजिक स्तरीकरण करणारे एक जैविक तत्व आहे. ज्यासाठी Gender किंवा Sex या इंग्रजी संज्ञेचा मानवी व्यवहारात मोठया प्रमाणात उपयोग केला जातो. ज्याचा अर्थ लिंगभाव असा होतो, मुळात स्त्री-पुरुषातील जैविक भिन्नता दर्शविण्यासाठी लिंग (sex) ही संज्ञा

वापरली जाते. तर Gender ही संकल्पना स्त्री-पुरुषातील सामाजिक सांस्कृतिक भिन्नतेशी संबंधित आहे. समाजव्यवस्थेत स्त्री-पुरुष या जैविक भिन्नतेबरोबरच Transgender,Third Gender किंवा तृतियपंथियासाठी समाजव्यवस्थेत विविध भाषा व क्षेत्रात हिजडा, ख्वाजासरा, किन्नर, छक्का, पावैया, खुस्रा किंवा जंखा, नपुंसकुडू, कोज्जा, मादा, थिरुनानगाई, अली, अरवनी, अरावनी, अरुवनी या विविध संज्ञा उपयोगात आणल्या जातात. प्रत्येक राज्यानुसार त्यांचा इतिहास व संस्कृतित भिन्नता आहे.

'हिजडा' हा शब्द 'हिजर' या अरेबिक शब्दावरुन अस्तित्वात आला आहे. 'हिजर' म्हणजे 'आपली जमात सोडलेला', जमातीतून बाहेर पडलेला. म्हणजेच स्त्रीपुरुषांच्या समाजरचनेतून बाहेर पडून स्वतंत्र समाज करुन राहणारा हा अर्थ हिजडा या शब्दात अभिप्रेत आहे.

1) "जन्मल्यानंतर जिचे लिंग निश्चित करता येत नाही, अशी व्यक्ति म्हणजे तृतियपंथिय होय."
2) "लिंगबद्दल, शस्त्रक्रिया केलेली किंवा न केलेली व्यक्ति, उभयलिंगी लक्षणे दिसणारी व्यक्ति म्हणजे तृतियपंथिय होय"
3) "समाजात किन्नर, हिजडा, अरावनी व जोगता या नावाने ओळखली जाणारी व्यक्ति तृतियपंथिय होय" (तृ.ह.सं. कायदा-2019).
4) "हिजडा किंवा किन्नर म्हणजे शरीराची रचना पुरुषाची असणारा आणि लैंगिक ओळख, वेशभूषा आणि लैंगिक भूमिका स्त्रीप्रमाणे असणारा व्यक्ति होय." (नालसा निकालपत्र)

5) 'Transgender' म्हणजे लिंगभावाच्या पलिकडे स्त्री आणि पुरुष या दोन्ही संकल्पनामध्ये ते बसत नाही.

अशा या तृतियपंथियांना सामाजिक जीवनात उपेक्षित, शोषित, वंचित, अवहेलनात्मक जीवन जगावे लागते.

महाराष्ट्राच्या विविध विभागांपैकी मराठवाडा एक महत्वपूर्ण विभाग आहे. त्याचे क्षेत्रफळ 64,811 चौ.किमी. असून महाराष्ट्राशी हे प्रमाण 29 टक्के आहे. हा विभाग हैद्राबाद निझामाच्या सत्तेचा एक भाग होता. मराठवाडयातील जिल्हानिहाय क्षेत्रफळ औरंगाबाद 10099.8, परभणी 1104.1, बीड- 10615.3, नांदेड- 10502, उस्मानाबाद 6512.4, जालना 7612, लातूर 7371.9 चौ.किमी. आहे. भौगोलिकदृष्टया हा विभाग 170.35^0 ते 200.40^0 उत्तर अक्षांश आणि 74.40 ते 72.15 अक्षांश पूर्व रेखांश मध्ये पसरलेला आहे.

2011 च्या भारतीय जनगणनेनुसार भारतात 8,87,803 इतकी तृतियपंथियांची संख्या आहे. तर महाराष्ट्रात एकूण 40,891 इतकी तृतियपंथीयांची संख्या आहे. 21 व्या शतकात आधूनिक विचारप्रवाहामुळे अमूलाग्र परिवर्तन घडून आले आहे. तृतियपंथियांना आजही उपेक्षित, वंचित, शोषितांचे जीवन जगावे लागते. त्यांना मुल जन्मल्यानंतर, लग्नसमारंभात व कार्यक्रमात आशिर्वाद देण्यासाठी बोलविले जाते. पण त्याव्यतिरिक्त त्यांना समाजात योग्य असा सन्मान दिला जात नाही. तृतियपंथियांना जीवन जगताना अनेक समस्यां चा सामना करावा लागतो. त्यांचा कोणत्याही स्तरावर स्वीकार केला जात नाही. तृतियपंथिय स्वभावामुळे हा समूह शिक्षण

हक्कापासून वंचित आहे. कुटूंबाद्वारे त्यांची हेटाळणी व तिरस्कार केला जातो. कुटूंबाद्वारे बहिष्कृत केले जाते. साहजिकच शिक्षण नसल्यामुळे, कुटूंबाचा आधार नसल्यामुळे त्यांना बहिष्कृतपणाचे जीवन जगावे लागते. यामुळे त्यांच्या जीवनात उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो. यातुन ते भीक मागणे व देह विक्री करणे याद्वारे उदरनिर्वाह करतात. त्यांच्याकडे केवळ उपभोग्य वस्तूच्या दृष्टीने बघितले जाते. त्यांना बालवयात सामाजिक भेदभावाला, कौटुंबिक भेदभावाला सामोरे जावे लागते. तसेच त्यांच्या मानसिक गोंधळाचा फायदा घेऊन, नात्यातील जवळच्या व्यक्तिद्वारे त्यांचे शोषण केले जाते. त्यांना मोठया प्रमाणात शारीरिक, मानसिक समस्येला सामोरे जावे लागते. मतदान अधिकार, नालसा निकालपत्र, तृतियपंथिय हक्क संरक्षण कायदा 2019 यांचा त्यांच्या जीवनावरील प्रभावाचे अध्ययन भावनिक नाही तर मानवतातवादी दृष्टीकोणातून करणे आवश्यक आहे.

पूर्वाभ्यास अवलोकन (Review of Literature) :

यात तृतियपंथियांच्या अभ्यासासाठी उपलब्ध झालेल्या अभ्यासाचा मागोवा घेण्यात येणार आहे.

लक्ष्मीनारायण त्रिपाठी लिखित व **वैशाली रोडे** अनुवादीत 'मी हिजडा…….मी लक्ष्मी' या आत्मचरित्रात त्रिपाठी यांनी तृतियपंथियांच्या जडणघडणीचे सविस्तर वर्णन केले आहे. यात तृतियपंथियांच्या पौराणिक, ऐतिहासिक पाश्वभूमी बरोबरच तृतियपंथियांशी संबंधित विविध संज्ञा व समस्यांचे विश्लेषण केले आहे.

स्वाती चांदोरकर यांनी 'हिजडे' या ग्रंथात तृतियपंथियांची समाजाद्वारे केली जाणारी हेटाळणी तसेच त्यांचे सामूहिक, कौटूंबिक जीवनाबरोबर शारीरिक, मानसिक व आरोग्यविषयक व आर्थिक समस्यांचे विश्लेषण केले आहे.

के. वनजा यांनी 'क्वीर विमर्श' (लेस्बियन, गे, बाई-सेक्सुअल, ट्रान्सजेंडर) या ग्रंथात sex आणि gender या संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. तसेच LGBTIQ यांचे सविस्तर विश्लेषण केले आहे. तसेच LGBTIQ समुदायाच्य भूतकालिन व वर्तमानकालिन सामाजिक स्थितीचे सविस्तर विश्लेषण केले आहे.

मनोबी बंद्योपाध्याय यांनी 2018 साली 'पुरुष तन मे फँसा नारी मन' या आत्मचरित्रात तृतियपंथियांना मुख्य सामाजिक प्रवाहात समाविष्ठ करण्याचा आग्रह केला आहे. यात त्यांनी तृतियपंथियांच्या अंर्तमनातील द्वंद्व आणि विखंडित व्यक्तिमत्व यांचे विश्लेषण केले आहे.

रजिया सुलताना यांनी त्यांच्या 'जन प्रवाहातील समलैंगिकता' या पुस्तकात समाजाने नाकारलेल्या, समाजाच्या परिघाबाहेर असलेल्या तृतियपंथिय समुदायाविषयी आपले निर्भिड व आधुनिक विचार मांडले आहेत.

कोहेन एल. यांनी (1995) Sexual nature, Sexual culture या संशोधनात हिजडा समुदायातील नपुंसकतेचे महत्व व लिंगच्छेद या धार्मिक परंपरेचे वर्णन केले आहे.

नंदा एस. यांनी (1999) The Hijras of India : Neither man nor woman : मध्ये हिजडयाच्या जीवनाचा प्रारंभ, वेशभुषा, विशिष्ट टाळी वाजविणे

स्त्रीवाचक शब्द स्त्रीलिंगी नावाचा दैनंदिन व्यवहारातील उपयोग कशा प्रकारे करतात ? याचे विश्लेषण केले आहे.

डॉ. **सी.के. गारियाली** यांनी ‘Transgender in India’ या ग्रंथात देशातील विविध क्षेत्रातील अनेक ट्रान्सजेंडर यशवंताच्या कथा दिल्या आहेत.

कौस्तव बक्षी आणि **रोहित दासगुप्ता** (2019) यांनी Queer studies – (Text, Centext, Praxis) या ग्रंथात लैंगिक नागरिकत्व आणि सक्रियता यावर इतिहास लेखन, सांस्कृतिक सिध्दांत, एथनोग्राफिक संशोधनाच्या आधारे तृतियपंथियांचे सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा वेध होतो.

संशोधनाचे महत्व : (Importance of research)

सामाजिक कार्यकर्ते व संशोधक यांच्याकडून सामाजिक समस्यावर संशोधन करुन, त्या ज्ञानाच्या आधारे सामाजिक प्रश्न हाताळण्याचा व त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न अवितरपणे चालु असतो. अशा प्रकारच्या सामाजिक संशोधनाची नियोजनबध्द व प्रभावी सामाजिक विकासासाठी देशाला नितांत आवश्यकता आहे.

‘मराठवाडयातील तृतियपंथियांच्या सामाजिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन’ या विषयांतर्गत तृतियपंथियांची सांख्यिकिय माहिती गोळा करुन, त्यांच्याबद्दल असणारे गैरसमज दूर करुन समतापूर्वक, सन्मानजक त्यांचे अस्तित्व जपून समाजाच्या मुख्यप्रवाहात आणण्यासाठी उपयोग होईल. प्रस्तुत संशोधन शासन, स्वयंसेवी संस्था, निमशासकिय

संस्था, तृतियपंथियांच्या संघटना व इतर संबंधित संस्थांना योजना आखतांना उपयुक्त ठरणारे आहे.

संशोधनाची उद्दिष्टये (Objectives of Reasearch) :

तृतियपंथियांच्या संशोधनासाठी निश्चित केलेली उद्दिष्टये पुढील प्रमाणे आहेत.

1. तृतियपंथियांच्या वैयक्तिक व कौटूंबिक स्थितीचे अध्ययन करणे.
2. तृतियपंथियांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे अध्ययन करणे.
3. तृतियपंथियांच्या शारीरिक, मानसिक व आर्थिक समस्या जाणून घेणे.
4. तृतियपंथियांसाठी असणाऱ्या विविध शासकिय योजना (सुविधा) व विविध कायद्यांचा अभ्यास करणे.
5. तृतियपंथियांच्या आरोग्यविषयक समस्यांचे अध्ययन करणे.

गृहितके (Hypothesis) :

1. तृतियपंथियांना वैयक्तिक व कौटूंबिक समस्यांचा सामना करावा लागतो.
2. तृतियपंथियांना सांस्कृतिकदृष्टया महत्वपूर्ण स्थान असून, सामाजिकदृष्टया बहिष्कृतपणाचे जीवन जगावे लागते.
3. तृतियपंथियांना शारीरिक, मानसिक व आर्थिक समस्यांचा सामना करावा लागतो.
4. तृतियपंथियांसाठी असणाऱ्या विविध शासकिय योजना (सुविधा) व कायद्यांची योग्यरित्या अंमलबजावणी केली जात नाही.

5. तृतियपंथियांना अनेक आरोग्यविषयक समस्यांचा सामना करावा लागतो.

संशोधन पध्दती : (Research Methodology)

अ) संशोधन अध्ययनाचे क्षेत्र (Area of Research Study) :

'मराठवाडयातील तृतियपंथियांच्या सामाजिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन' हे या संशोधनाचे कार्यक्षेत्र किंवा विश्व आहे. यात या विभागाची ऐतिहासिक व वर्तमानकालिन पार्श्वभूमी थोडक्यात स्पष्ट करण्यात येईल.

ब) संशोधन विषय (Research Subject) :

'मराठवाडयातील तृतियपंथियांच्या सामाजिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन' हा प्रस्तुत संशोधनाचा विषय राहणार आहे ज्यात तृतियपंथियांच्या वैयक्तिक, कौटूंबिक व सामाजिक जीवनाच्या अध्ययनाबरोबरच तृतियपंथिय जीवन जगतांना निर्माण झालेल्या सामाजिक, कौटूंबिक, शारीरिक, मानसिक, आर्थिक व आरोग्य विषयक समस्यांचे अध्ययन करण्यात येणार आहे. त्याआधारे निष्कर्ष काढण्यात येणार आहे.

क) नमुना निवड पध्दती (sampling technique) :

'मराठवाडयातील तृतियपंथियांच्या सामाजिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन' या विषयावरील संशोधन असल्यामुळे साहजिकच मराठवाडयातील तृतियपंथिय हा प्रस्तुत संशोधनाचा समग्र ठरतो. म्हणून यात तृतियपंथियांची नमूना म्हणून निवड केली जाईल. ही निवड वैज्ञानिक व शास्त्रीय दर्जाची व्हावी म्हणून मराठवाडयातील प्रत्येक जिल्हयाच्या

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून, नोंदणीकृत तृतियपंथियांची यादी मिळविली जाईल. या यादीतून सहेतुक नमुना निवड पध्दतीने 10 टक्के नमुना घटकाची निवड केली जाईल.

ड) तथ्य संकलन पध्दती (Data Collection Method) :

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी संशोधनाचे क्षेत्र आणि त्यातील एककांना लक्षात घेऊन, अभ्यासाचे महत्व, स्वरुप, व्याप्ती आणि उद्दिष्टानुसार योग्य अशा तथ्य संकलन करण्याच्या दृष्टीकोणातून प्राथमिक व दुय्यम स्त्रोताचा व साधनांचा उपयोग करण्यात येणार आहे.

1) प्राथमिक साधन सामुग्रीमध्ये अनुसूची तंत्राचा उपयोग करुन, तृतियपंथियांच्या वैयक्तिक, कौटूंबिक, सामाजिक, आर्थिक जीवनासंदर्भात माहिती संकलित करण्यात येणार आहे. तसेच अनुसूची तंत्राबरोबरच निरीक्षण तंत्राचाही उपयोग करण्यात येणार आहे.

2) त्याबरोबर दुय्यम साधनसामुग्रीचाही उपयोग करण्यात येणार आहे. ज्यात विषयाच्या अनुषंगाने प्रकाशित व अप्रकाशित लिखाण (M.Phil., Ph.D. चे शोधप्रबंध) मासिके, संदर्भग्रंथ, आत्मचरित्र, लेख, शासकिय निर्णयपत्र इत्यादी उपलब्ध माहितीचा उपयोग केला जाणार आहे.

ई) तथ्यांचे विश्लेषण (Analysis of Data) :

विविध सांख्यकीय व गणितीय पध्दतीच्या साधनाद्वारे उपलब्ध तथ्यांचे विश्लेषण करण्यात येईल.

8) **संशोधन आराखडा** (**Research Design**) :

प्रस्तुत संशोधन हे वर्णनात्मक संशोधन आहे. त्यामुळे या संशोधनात वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा उपयोग करुन, त्यानुसार संशोधन प्रक्रिया पार पाडल्या जाईल.

प्रकरण योजना :

प्रस्तुत संशोधनासाठी तथ्य संकलन व तथ्य विश्लेषण प्रक्रिया पार पाडल्यानंतर संशोधन आहवाल प्रबंध स्वरुपात सादर केला जाईल. त्याची प्रकरण योजना पुढील प्रमाणे आहे.

प्रकरण पहिले – प्रस्तावना

1.1. प्रस्तावना

1.2. लिंग (लिंगभाव संकल्पना) व लिंगभेद संकल्पना

1.3. तृतियपंथिय संकल्पना व संबंधित संज्ञा

1.4. तृतियपंथियाची पौराणिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी

1.5. साहित्याचा आढावा

प्रकरण दुसरे – संशोधन पध्दती

2.1 प्रस्तावना

2.2 संशोधन विषय

2.3 संशोधनाचे महत्व

2.4 संशोधनाची उद्दिष्टये

2.5 गृहितके

2.6 नमुना निवड पध्दती

2.7 तथ्य संकलन पध्दती

2.8 संशोधकाचे अनुभव

प्रकरा तिसरे – संशोधन क्षेत्र

3.1. भौगोलिक स्थान

3.2. ऐतिहासिक माहिती

3.3. शैक्षणिक विकास

3.4. सामाजिक व सांस्कृतिक माहिती

3.5. सारांश

प्रकरण चौथे :

* **तृतियपंथियांची वैयक्तिक, कौटूंबिक, सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी :**

प्रस्तुत प्रकरणात तृतियपंथियांची वैयक्तिक, कौटूंबिक, सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी स्पष्ट करण्यासाठी सर्वेक्षणांतर्गत संकलित केलेल्या तथ्य (माहितीचे) वर्णन व विश्लेषण केले जाईल.

प्रकरण पाचवे – तृतियपंथियांच्या समस्या

प्रस्तुत प्रकरणात तृतियपंथियांकडून अनुसूचीद्वारे प्राप्त माहितीच्या आधारे त्यांच्या जीवनातील समस्यांचा शोध घेऊन, त्यांची मांडणी समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून करण्यात येईल.

प्रकरण सहावे –

*** तृतियपंथियांसाठी असणारे कायदे व सुविधांचा तृतियपंथियावरील प्रभाव**

प्रस्तुत प्रकरणात तृतियपंथियांसाठी असणारे कायदे व सुविधांचा त्यांच्या जीवनावर झालेल्या प्रभावाचे प्राप्त माहितीच्या आधारे विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण सातवे –

***निष्कर्ष आणि उपाययोजना**

प्रस्तुत प्रकरणात निष्कर्षाची मांडणी करुन उपाययोजना सूचविण्यात येतील.

संदर्भ सूची :

1) Dr. C.K. Gariyali – Transgender in India, Saraswati Educational Cultural & Charitable Trust Publication.

2) Kaustar Bakshi, Rohit K. Dasgupta – 'Queer studied (Text, Context, Praxis), Orient Blackswan Publication.

3) Satish Chandra (Eds) : "Psychosocial & Education Problems of LGBTQ Communities.

4) Cohen L. (1995) in P.R. Abramson & S.D. Pinkerton (Eds) Sexual Nature, Sexual Culture, University of Chicago Press.

5) Nanda S. (1999) The Hijras of India : Neither man nor woman 1 (Edi), California Wadsworth Publishing Co.

6) के. वनजा – 'क्वीर विमर्श' (लेस्बियन, गे, बाईसेक्सुअल, ट्रान्सजेन्डर, वाणी प्रकाशन.

7) मनोबी बंद्योपाध्याय (2018) – पुरुष तन मे फँसा नारी मन

8) लक्ष्मीनारायण त्रिपाठी, अनु. वैशाली रोडे (2016) "मी हिजडा......मी लक्ष्मी" मनोविकास प्रकाशन पुणे.

9) स्वाती चांदोरकर – हिजडे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

10) प्रा. डॉ. जयश्री बारई, तृतियपंथिय, विद्याबुक पब्लिकेशन

11) बिंदुमाधव खिरे, "सप्तरंग (तृतियपंथिय, ट्रान्सजेन्डर, मुलामुलींच्या आत्मकथा)" संपथिक ट्रस्ट प्रकाशन, पुणे.

12) रजिया सुलताना (2012) जनप्रवाहातील समलैंगिकता, नभ प्रकाशन, अमरावती.

13) डॉ. घनश्याम ठाकूर (2018) इतिहास के झरोखे मे किन्नर, कन्सेप्ट 5जी प्रकाशन.

14) Parmarsh Shahani : Queeristan

15) Rabib Tarafder & Ajay Mujumder : 'A scientific aspect of transgender, Notion Press.

16) Upasana Borah, Recognition to the rights of transgender, the need of the hour, vol. 1, Notion press.

17) Dr. Madhusudan B. (2021) Transgender Rights, Kalpaz Publication.

18) Anmol Rhilla, Transgender Act 2019, An analysis, vol-I, Notion press media pvt. ltd.

19) Mrinalini, Transgender in society, challenges and solutions, MJP Publisher.

20) Devath Suresh, Transgenders problems and administrative response, Raj Publication.

21) S. Nanjundeswamy and M.R. Gangadhar, Transgender Challenges in India, AAYU.

वरील प्रारुप आराखडा व हा स्थुल स्वरुपाचा असून संशोधनाची प्रक्रिया राबवित असतांना त्यात आवश्यक ते बदल केले जातील.

मार्गदर्शक
प्रा. डॉ. फिसफिसे टि.आर.
समाजशास्त्र विभाग प्रमुख
श्री. शिवाजी महाविद्यालय, परभणी

संशोधक विद्यार्थी
लोखंडे संदीपकुमार भिमराव
एम.ए., बी.एड्. नेट (समाजशास्त्र)